# मानव अधिकारांच्या परिप्रेक्ष्यातून पर्यावरणीय राजकारण आणि शाश्वत विकासातील आंतरसंबंध

**सविता सुरेश घरजारे , संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती**

---

'मानव अधिकार', 'पर्यावरण' आणि 'शाश्वत विकास' या संकल्पना गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ जागतिक चर्चेत केंद्रस्थानी आहेत. दोन महायुद्धांनंतर ज्या प्रकारे जीवित, वित्त हानीसह नैसर्गिक हानी झाली आहे, या हानीतून निःसंशयपणे वर्तमान आणि भावी पिढ्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर विशेषतः शीतयुद्धाच्या कालखंडात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात विकासाचे नवे आयाम प्रस्थापित होऊ लागले, त्यामुळे निसर्गाची प्रचंड हानी झाली. नैसर्गिक संसाधनांच्या नाशामुळे पृथ्वीवरील सर्व प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे दिवसेंदिवस ज्या प्रकारे शोषण होत आहे, त्यामुळे येणाऱ्या पिढ्यांची चिंता वाढली आहे. अशाप्रकारेनिसर्ग आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे होत असलेल्या नुकसानीमुळे बिघडत चाललेली परिस्थिती सुधारण्यासाठी जगातील सर्व राष्ट्रांना शाश्वत विकासाची संकल्पना स्वीकारावी लागेल. या दृष्टीने जागतिक पातळीवर प्रयत्न सुरू झाले आहेत. परंतुशाश्वत विकासाच्या या प्रयत्नांबद्दल जगातील संपूर्ण मानवी समुदाय हा फारसा आश्वस्त नाही. कारण आजही, शाश्वत विकासाच्या नियमनाबाबत विकसित आणि विकसनशील देशांमधील वादामुळे व त्याच्या केल्या जाणाऱ्या राजकारणामुळे, या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांमध्ये बरेच अडथळे येत आहेत.या पार्श्वभूमीवर मानव अधिकारांच्या परिप्रेक्ष्यातून पर्यावरणीय राजकारण आणि शाश्वत विकासातील आंतरसंबंधाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आले आहे.

'पर्यावरण', 'मानव अधिकार' आणि 'शाश्वत विकास' या संकल्पनाआज जागतिक विचार विश्वाच्या केंद्रस्थानी आहेत. कारण आज पृथ्वीतलावरील संपूर्ण जन-जीवनच पर्यावरणाच्या –हासामुळे प्रभावित झाले आहे. पर्यावरणाच्या हानीमुळे दिवसेंदिवस मानव जातीवर अनेक अरिष्टये ओढवली जात आहेत. परिणामी, पृथ्वीवरील मानवी जीवनाबरोबरच संपूर्ण जैवीक साखळीच धोक्यात आली आहे. साधारणात: अठराव्या शतकातील औद्योगिक क्रांतीनंतर विकसित झालेल्या विकासाच्या 'आर्थिक प्रारुपाने' नैसर्गिक संसाधनांच्या अतिरेकी वापराने प्रचंड चालना मिळाली व त्यातून पर्यावरणाची अपरिमित हानी झाली. पर्यावरणाच्या अशा हानिमुळे पृथ्वीवरील संपूर्ण जैवीक साखळीच्याच अत्विवाचा धोका निर्माण झाल्याचे काही शास्त्रज्ञ व अभ्यासकांच्या लक्षात आल्यावर याविषयीची जगभर जनजागृती सुरु झाली. विशेष म्हणजे विकसीत, विकसनशिल अशा सर्वच राष्ट्रातील नागरिकांमधून पर्यावरण संरक्षणासाठीच चळवळी सुरु होवून 'पर्यावरणवाद' आकाराला आला. हळूहळू पर्यावरणाच्या संवंधन व संरक्षणासाठी लढा देणा-यांना 'पर्यावरणवादी' म्हटले जावू लागले. खरेतर आज प्रत्येक मनुष्यच पर्यावरणवादी असावयास हवा, परंतु पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन हे संपूर्ण जीवसृष्टीच्या अतिस्त्वाकरीता कसे गरजेचे आहे याविषयीच्या जाणिवा लोकांमध्ये अद्यापही न रुजल्यामुळे व काही लोकांचे हितस्वार्थ असल्यामुळे पर्यावरणावादाच्या समर्थकांची संख्या मर्यादित आहे. संख्या मर्यादीत का असेना पर्यावरणवाद्यांनी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी सुरु केलेल्या लढयामुळेच आज जवळपास सर्वमान्य अशा 'शाश्वत विकास' या विचारापर्यंत आज जग येवून पोहोचले आहे.

शाश्वत किंवा टिकाऊ किंवा चिरंतन अथवा सतत अशा कोणत्याही नावाने प्रचलित विकासाची संज्ञा ही आज जगात सर्वत्ररुजतेआहे. त्यामुळे मानव अधिकारांच्या परिप्रेक्ष्यातून शाश्वत विकासाची गरज समजून घेण्यापूर्वी 'पर्यावरणवाद' ही संकल्पना वा चळवळ समजून घेणे गरजेचे आहे.

**पर्यावरणवाद:** आधुनिक जगाचे एक महत्वपूर्ण वैशिष्टये म्हणजे औद्योगिक विकास औद्योगिक विकासाची युरोपात सुरुवात झाली आणि हळूहळू या विकासाने संपूर्ण जग व्यापून टाकले. आर्थिक विकासाच्या कार्यक्रमाने राष्ट्रां-राष्ट्रांमध्ये जणूकाही स्पर्धाच सुरु झाली. 'विकास विकास विकास' हेच जणू आजच्या जगाचे ब्रिद बनले आहे, परंतु आर्थिक विकासाच्या या अघोरी हव्यासापोटी पर्यावरणाची मात्र प्रचंड हानी किंबहूना –हासच होत आहे. पर्यावरणाच्या अशा होणा-य –हासातूनच अनेक जीवघेण्या समस्या निर्माण झाल्या आहेत. परिणामी, संपूर्ण जीवसृष्टीचे अस्तित्वच त्यामुळे धोक्यात आले आहे. पर्यावरणाचा होत असलो –हास वेळीच थांबवला नाही तर पृथ्वीवरील सजीवसृष्टि संपुष्टात येईल. हा धोका ज्यांना ओळखता आला. त्यांनी पर्यावरणाचा –हास रोखण्याकरीता जे प्रयत्न सुरु केले त्यातूनच पर्यावरणवादी अर्थात पर्यावरणवाद जन्मास आला. पुढे पृथ्वी व

पृथ्वीवरील सजीव सृष्टीचे विविध घटक हयांच्यातील परस्पर संबंधाच्या अभ्यासाचे शास्त्र म्हणजे 'पर्यावरणशास्त्र'[१]अर्थात 'Ecology' हा अभ्यास विषय समोर आला.

नैसर्गिक साधन संपत्ती ही सीमीत असून मनुष्याकडून तिच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा असिमीत वापर सुरु आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या विशेषज्ञ समितीच्या अहवालानुसार, "पृथ्वीवरील पर्यावरण हे नाशवान असून त्याची स्व-शुद्धीची शक्ती आम्हाला समजलेली नाही, परंतु ती सीमित आहे एवढे निश्चित."[२] त्यामुळे साधन संपत्तीच्या पुनर्निमीतीच्या चक्राच्या गतीपेक्षा तिचे प्रचंड वेगाने होत असलेले दोहन हे पृथ्वीवरील सजीवसृष्टीच्या विनाशासाठी जबाबदार ठरतो आहे. या जाणीवेतूनच पर्यावरणवादी विचारांचा उदय झाला आहे. आर्थिक विकासाची वाढती भूक व विकोपाला टेकलेला चंगळवाद त्यामुळे वस्तु-पदार्थांचे अमर्याद उत्पादन केले जात आहे.

आधुनिक समाजात लोक त्यांच्या गरजेपेक्षा अधिक वस्तु-उत्पादनाचा उपयोग करीत आहेत. कारखान्यांमधून वस्तु-उत्पादन मोठया प्रमाणात करुन ते बाजारात आणले जात आहे. त्यामुळे बाजारातील वस्तु आकर्षणापोटी लोक गरजेपेक्षा अधिक संसाधनांचा उपयोग करतांना दिसून येत आहेत. यालाच 'चंगळवाद' म्हटले गेले आहे. वस्तुंच्या अमर्याद उत्पादनासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीची कच्च्या मालासाठी प्रचंड नासधुस केली जात असून त्यातून नैसर्गिक साधनसंपत्तीचा तर उपसा होतच आहे बरोबरच विल्हेवाट न लावता येणारा कचरा व प्रदुषण यांसारखे भयंकर समस्या निर्माण झाल्या आहेत. वाढत्या प्रदूषणामुळे श्वसनेंद्रियांशी संबंधित अनेक रोग होतात. हवेतील विषाणुंचे प्रमाण वाढल्याने रोगराई होते. ध्वनि प्रदूषणामुळे शारीरिक व मानसिक आजार उद्भवतात. चिडचिडेपणा, रक्तदाब वाढणे, एकाग्रता नष्ट होणे, ताणतणाव वाढणे, बहिरेपणा इ. स्वरूपाच्या तक्रारी वाढून माणसाचे आरोग्य बिघडते. जलप्रदूषणामुळे कॉलरा, टायफॉईड, गॅस्ट्रो, कावीळ यांसारखे रोग होतात.[३] मानवी जीवनावर होणाऱ्या अशा अनेक दुष्परिणामांमुळे त्याच्या प्रतिष्ठापूर्ण व आनंदी जीवन जगण्याचा अधिकारच धोक्यात आला आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे पृथ्वीवरील सजीवसृष्टीस पोषक व संवर्धक क्षमता संपुष्टात येणार असल्याच्या निष्कर्षापर्यंत हा पर्यावरणीय विचार आला आहे.

निसर्ग आणि पर्यावरणाच्या हानीमुळे आपली संपूर्ण मानवी सभ्यता आणि जीवनच असुरक्षित आणि अनिश्चित बनत असल्याची जाणीव आज जगभर होऊ लागलेली आहे. तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासाची प्रक्रिया बौनी असावी लागते. १८ व्या शतकात औद्योगिकीकरण सुरू झाले आणि हळूहळू ही प्रक्रिया जगभर प्रस्थापित झाली. विशेषतः या औद्योगिकीकरणामुळे युरोपीय देश विकसित झाले. विकसनशील देशांनी विकासाचा हा युरोपीय मार्ग निवडणे स्वाभाविक होते. युरोपीय देशांच्या विकासाचे आर्थिक मॉडेल केवळ स्वार्थावर आधारित होते. केवळ त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, राष्ट्रांनी मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक संसाधने लुटण्यास सुरुवात केली, ज्यामुळे पृष्ठभागावरील जीवनासाठी आवश्यक असलेले पाणी आणि हवेचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण झाले. परिणामी, पर्यावरणीय प्रणालीवर वाईट परिणाम होत आहे आणि ग्रीन हाउस इफेक्ट, ग्लोबल वॉर्मिंग सारख्या भयानक समस्या जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी एक गंभीर आव्हान म्हणून उदयास आल्या आहेत. विशेष म्हणजे मानवी इतिहासात आजपर्यंत मोठ्या संघर्षानंतर पप्राप्त केलेल्या मानव अधिकारांचे प्रचंड हनन होत आहे.

**मानव अधिकार :** पृथ्वीवरील पर्यावरण व पारिस्थितीकी आणि मानवी जीवन यांच्यातील परस्पर संबंध हे अविभाज्य स्वरूपाचे आहेत. किंबहुना पारिस्थितीकी मधील मानवी जीवनाचे अस्तित्व हे पर्यावरणाच्या विवेकी संतुलनावरच अवलंबून असल्याने प्रत्येक व्यक्तीला पोषक, आरोग्यदायी व आनंदी जीवन जगण्याचा नैसर्गिक व घटनादत्त अधिकार त्यातूनच सुरक्षित होतो असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे होणार नाही. आज ज्या मानव अधिकारांचे रचनात्मक स्वरूप जगभर बघायला मिळते त्यांचा उगम हा प्राचीन मानवी इतिहासात झालेला दिसून येतो. परंतु आधुनिक काळ हा मानव अधिकारांसाठी अधिक आव्हानात्मक काळ असल्यामुळेच या अधिकारांना अधिक व्यापक, रचनात्मक व वैश्विक स्वरूप प्राप्त झाल्याचे आढळून येते. कालौघात हळूहळू या मानव अधिकारांचा अधिकाधिक विकास होत त्यांचा जागतिक स्तरावर व देशादेशांतील राज्यघटनांमध्ये अंतर्भाव होऊ लागला. या क्रमामध्ये मानवाधिकारा ंचे वैश्विक घोषणापत्र हे महत्वाचे मानले जाते. मानवाधिकाराचे वैश्विक घोषणापत्र ( Universal Declaration of Human Rights (UDHR)) हे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १० डिसेंबर, १९४८ रोजी स्वीकारलेले घोषणापत्र आहे. हे घोषणापत्र प्रारंभी बंधनकारक कायदा/नियम नसतानाही जगभरात स्वीकारले गेले. १९४८ सालापासून हे

घोषणापत्र जगभरातील विविध देशांच्या राज्यघटना व बरोबरच विविध जागतिक, राष्ट्रीय, प्रादेशिक कायदे व करार यांवरही आपला ठसा उमटवत आहे.

प्रस्तुत घोषनापत्रातील सर्व तरतुदी ह्या व्यक्ति जीवनासाठी अत्यावश्यक अशा आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने अनुच्छेद – १ नुसार, सर्व मानवी व्यक्ती जन्मतः स्वतंत्र आहेत व त्यांना समान प्रतिष्ठा व समान आधिकार आहेत. त्यांना विचारशक्ती व सद्सद् विवेकबुद्धी लाभलेली आहे व त्यांनी एकमेकांशी बंधुत्वाच्या भावनेने आचरण करावे. अनुच्छेद – २ नुसार, या जाहीरनाम्यात नमूद केलेले सर्व अधिकार व सर्व प्रकारचे स्वातंत्र्य प्रत्येकास आहे व त्या बाबतीत वंश, वर्ण, स्त्री-पुरुषभेद, भाषा, धर्म, राजकीय किंवा इतर मतप्रणाली, राष्ट्रीय किंवा सामाजिक मूलस्थान, संपत्ती, जन्म किंवा इतर दर्जा यासारखा कोणताही भेदभाव केला जाता कामा नये. आणखी असे की, एखादी व्यक्ती ज्या देशांची किंवा प्रदेशाची रहिवासी असेल त्या देशाच्या किंवा प्रदेशाच्या, मग तो देश किंवा प्रदेश स्वतंत्र असो, स्वायत्त शासन नसलेला असो किंवा कोणत्याही प्रकारच्या सार्वभौमत्वाखाली असो, राजकीय, क्षेत्राधिकारात्मक किंवा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कारणास्तव कोणताही भेदभाव करता कामा नये. अनुच्छेद – ३ नुसार, प्रत्येकास जगण्याचा, स्वातंत्र्य उपभोगण्याचा, सुरक्षित असण्याचा अधिकार आहे.[४] भारतीय राज्यघटनेने नागरिकांना सहा मूलभूत अधिकार दिलेले आहेत. त्यामध्ये – अनुच्छेद – १४ ते १८ : **समतेचा अधिकार**, अनुच्छेद – १९ ते २२ : **स्वातंत्र्याचा अधिकार**, अनुच्छेद – २३ ते २४ : **शोषणाविरुद्धचा अधिकार**, अनुच्छेद – २५ ते २८ : **धर्मस्वातंत्र्याचा अधिकार**, अनुच्छेद – २९ ते ३० : **सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार**, अनुच्छेद – ३२ : **घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार**.

प्रस्तुत तरतुदींतर्गत व्यक्तीला सर्वार्थाने सुरक्षित व आरोग्यदायी जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. परंतु वर्तमान काळात पर्यावरणाच्या सुरु असलेल्या ऱ्हासामुळे व्यक्तीचे शारीरिक व मानसिक आरोग्यच धोक्यात आल्यामुळे एकूणच मानवी जीवनाच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे. अशावेळी उपरोक्त मानव अधिकारांच्या तरतुदींची प्रामाणिक अंमलबजावणी ही शाश्वत विकासाच्या मार्गाने पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यातूनच होऊ शकते याची जाणीव आणि त्यासाठी व्यक्ति, संस्था व सरकारे यांनी आग्रही असणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे मागील काही वर्षांपासून या दिशेने देश व जागतिक पातळीवर प्रयत्न सुरु असल्याचे निदर्शनास येत असले तरी शाश्वत विकासाची लक्ष्य प्राप्ती हे अजूनही मानव जातीकरिता एक दिवास्वप्नच ठरले आहे.

**शाश्वत विकासाकडे :** आज विकास प्रक्रियेने संपूर्ण जगाला व्यापून टाकलेले आहे. एकूण विकासाच्या विचार करता सर्वाधिक विकास हा शेती व कारखाने या क्षेत्रात झालेला आहे.त्यामुळे उपलब्ध नैसर्गिक संपत्तीच्या आधारे जास्तीत जास्त लोकांना सामावून घेण्याची क्षमतासुद्धा वाढली आहे; पण हा सर्व आर्थिक विकास करत असताना हवामान, जलचक्र, जैवविविधता आणि परिसंस्था यांच्यात धोकादायक बदल झालेले आहेत. हवामान व जलचक्र बिघडत आहे, जैवविविधतेचा व परिसंस्थांचा ऱ्हास होत आहे व ही अतिशय गंभीर बाब आहे. विकासासाठी या सर्वांचा बळी जात आहे. त्यामुळे असा प्रश्न निर्माण होतो, की विकास चालू ठेवायचा का? जर आर्थिक विकास चालू ठेवला तर निसर्गात झपाट्याने बदल होत आहेत; जर विकास थांबवला तर एवढ्या प्रचंड लोकसत्तेचा भार कसा पेलायचा? पृथ्वी या वाढत्या लोकसंख्येचा भार भविष्यात पेलू शकेल का ? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे शाश्वत विकास. देशाची प्रगती तर थांबवू शकत नाही. त्याचप्रमाणे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ देणेही परवडणार नाही. या दोन्हींचा सुवर्णमध्य म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ न देता केलेला विकास. १९७२ मध्ये स्टॉकहोम पर्यावरण परिषदेत बिघडलेल्या परिस्थितीवर प्रथम चर्चा झाली. त्यामध्ये शाश्वतता किंवा शाश्वत विकास ही संकल्पना पर्यावरण आणि विकास यांच्यातील दरी भरून काढण्यासाठीचा पूल म्हणून घेतली गेली आहे.[५]

शाश्वत विकासाची संकल्पना १९८७ साली "वर्ल्ड कमिशन ऑन एनव्हायन्मँट अण्ड डेव्हलपमेंट' यांनी "आपले समान भविष्य' (Our Common Future) रिपोर्टमध्ये मांडली. ब्रुंडलँड अहवालाला "आपले सामान्य भविष्य" असेही म्हटले जाते.[६] या अहवालामध्ये,भविष्याबद्दलचा विचार करून विकास करावा ही मूळ कल्पना आहे. कमिशनचे अध्यक्ष व नॉर्वेचे प्रधानमंत्री ग्रो हरलेम ब्रुंडलँड यांनी शाश्वत विकासाची केलेली व्याख्या करताना म्हटले आहे कि, - "भविष्यात पुढच्या पिढीला त्यांच्या गरजा भागवताना कोणतीही तडजोड करावी लागू नये ही काळजी घेऊन वर्तमानातील लोकांच्या गरजा भागवणे."[७]याचा अर्थ शाश्वत विकासाचा म्हणजे मानव जातीचा विकास पुढे अनेक वर्षे कोणताही अडथळा न येता चालू राहणे. शाश्वत

विकासाचा अर्थ वर्तमानातील विकास चालू ठेवायचाच पण तो चालू असताना त्याच्या पर्यावरणावरील परिणाम पुढच्या पिढीला भोगायला लागू नये म्हणून पर्यावरणाची थोडी काळजी व दक्षता घेऊन विकास करावयाचा. विशेष म्हणजे१९९२ ची रिओ शिखर परिषद आणि त्यानंतर अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा या पर्यावरण आणि शाश्वत विकासाशी संबंधित होत आहेत.[८] अलीकडे संयुक्त राष्ट्रांच्या अनेक कार्यक्रमांमधून 'मानवी विकासा' वर भर देण्यात येत असून त्यासाठी पर्यावरणीय राजकारणाची दिशा ही शाश्वत विकासाच्या मार्गावर आणण्याचा प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

मानवी विकासाचे मूल्यमापन करताना दोन दशकांपूर्वीपर्यंत केवळ आर्थिक बाबी विचारात घेतल्या जात. त्या अनुषंगाने देश आर्थिकदृष्ट्या संपन्न असून ज्या देशांतील लोक श्रीमंत आहेत अशा देशांना प्रगत राष्ट्रे म्हणून संबोधण्यात येत असे. व ज्या इतर देशांत गरिबी होती व आर्थिक विकासाचा अभाव होता अशा राष्ट्रांना प्रगतीशील देश म्हणून संबोधण्यात येत असे. उत्तरी अमेरिका तसेच युरोपमधले बहुतेक देश फार पूर्वी औद्योगिक दृष्ट्या संपन्न झाल्यामुळे आज आर्थिक दृष्टीने अधिक प्रगत आहेत. या देशांनी आपल्या देशातील नैसर्गिक संसाधनाचा शोध घेऊन त्याबरोबर प्रगतीशील राष्ट्रातील नैसर्गिक संसाधनाचा वापर करून आपली अर्थव्यवस्था बळकट केली. अशा तऱ्हेने विकास प्रक्रियेदरम्यान संपन्न देश आर्थिक दृष्ट्या अधिक सक्षम व संपन्न बनत गेले तर गरीब देश अधिक गरीब होत गेले. याप्रक्रियेत श्रीमंत देशांना हे कळून चुकले की त्यांचे जीवनमान प्रगतिशील देशांतील पर्यावरणामुळे प्रभावित होऊ शकते. म्हणून अलीकडच्या काळात पर्यावरणाच्या ऱ्हासाकरिता विकसनशील देशच कसे जबाबदार आहेत याचे राजकारण प्रगत देशांकडून केले जात आहे. परंतु हे मात्र खरे आहे कि, विकसित व विकसनशील देशातील या विकासप्रक्रियेमुळे जीवनस्तर व लोकांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न हा पर्यावरणाचा बळी देऊन केला जाऊ शकत नाही.

अशाप्रकारे उपर्युक्त वस्तुनिष्ठ विश्लेषणावरून मानव अधिकारांच्या परिप्रेक्ष्यातून शाश्वत विकास व पर्यावरणाचे रक्षण दोन्हींचा अन्योन्य संबंध स्पष्ट होतो. पृथ्वीवरील जीवसृष्टीचे रक्षण जतन व संवर्धन करावयाचे असेल तर आर्थिक भौतिकवाद व त्यातून फोफावलेला चंगळवाद यांना विरोध या तत्वावर आधारलेला पर्यावरणवादीदृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. पर्यावरणावाद्यांनी जगभर ठीकठीकाणी हरित चळवळ सुरु केल्या आहेत. अशा हरित चळवळींमध्ये जैविक शेती, शाकाहार, पर्यायी तंत्रज्ञान, शाश्वत विकास व या क्षेत्रात कार्य करणारेदबावगट, हित समूह व काही देशांमध्ये राजकीय पक्ष आदींचा अंतर्भाव होतो. शाश्वत विकासासाठी देश, समाज व व्यक्ति यांनी मानव अधिकारांच्या परिप्रेक्ष्यातून पर्यावरणीय राजकारण करणे आवश्यक असून त्यासाठी ठोस असा कृती कार्यक्रम आखणे व त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. अशा स्वरूपाच्या कृती कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने - लोकसंख्या वाढीवर नियंत्रण, दारिद्र्य निर्मूलन, नैसर्गिक संपत्तीचे संवर्धन, त्याज्य वस्तूंचा पुनर्वापर, प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न, कायद्यांचे पालन, संशोधन कार्य, पर्यावरणाबद्दल जनजागृती, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न, मूल्यांची जपणूक इत्यादी महत्वपूर्ण कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे पर्यावरणाच्या रक्षणातूनच शाश्वत विकास व शाश्वत विकास करण्यातूनच पर्यावरण व अंतिमतः मानव अधिकारांचे संरक्षण आणि संवर्धन होऊ शकते हे निर्विवाद आहे.

**संदर्भसूची :**

१. व्होराराजेंद्र, पळशीकरसुहास (संपा) र.भा.दास्तानेरामचंद्रआणिकं, पुणे, १९८७, पृ. १४५.
२. सिंहल एस. सी., समकालीन राजनीतिक मुद्दे, लक्ष्मी नारायण अग्रवाल, आगरा, २०१६, पृ.१४६.
३. सांगळे शैलजा , ताटके नीलम , पर्यावरण आणि समाज एक सखोल अभ्यास, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०११, पृ. १००.
४. https://mr.wikipedia.org
५. Peter P, Kazi F& John A.,An Introduction to Sustainable Development, Published by Glen Educational Foundation, Inc. 2008, Page 22.
६. Strange T. & Bayley A., OECD Publications, 2008, Page 24.
७. सांगळे शैलजा , ताटके नीलम , पर्यावरण आणि समाज एक सखोल अभ्यास, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०११, पृ. १००.
८. बसू रुमकी ,आणि समस्या ,सिद्धांत ,आंतरराष्ट्रीय राजकारण संकल्पना, SAGE Publication ,New Delhi ,२०१७, पृ.३८६.